# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक ०८/०३/२०१८**

**सभा सुचना क्रं. २९ दु ११.३० वा.**

| अ क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि.२३/०२/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. स्थायी समिती सभा दि. २३/०२/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २. | जागतिक महिला दिना निमित्त मार्गदर्शन महामेळावा आयोजित करणेबाबत. | ठराव :- महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार महानगरपालिका हद्दीतील जागतिक महिला दिनानिमित्त मार्गदर्शन मेळावे आयोजित करण्यांत यावे. याकरीता महानगरपालिका हद्दीत एकूण ७ ठिकाणी मेळाव्याचे आयोजन करण्यांत यावे. १) भाऊसाहेब वर्तक सभागृह, विरार २) स्व.कृष्णा मोरु पाटील विद्यालय, नालासोपारा ३) क्रीडा भवन मैदान, वसई गांव ४) साईनगर ग्राऊंड, नवघर माणिकपूर ५) बहुजन विकास आघाडी भवन, नालासोपारा ६) महानगरपालिका कार्यालय प्रभाग समिती सी ७) ज्ञानदिप विद्यामंदिर वालीव प्रभाग जी इ. ठिकाणी आयोजित करण्यांत येणार आहे. वार्षिक मंजूर ठेकेदारांमार्फत स्टेज खुर्ची, साऊंड सिस्टीम, बॅनर्स, चहा-नास्ता, जेवण, शाल, बुके, श्रीफळ, फोटोग्राफर, विविध पारितोषिके, पाहुण्यांचे मानधन, गुलाबाचे फुल, जनरेटर, इत्यादींची व्यवस्था करणे आवश्यक आहे. एका कार्यक्रमासाठी याकामी अंदाजे १५,००,०००/- रुपये खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३. | श्री. दिपक नारायण फणसेकर (मजुर) व.वि.शम हयांचा आईचे वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्ती करण्याबाबत मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- प्रस्तावाचा मजकूर पाहता श्री. दिपक नारायण फणसेकर (मजूर) ह्यांच्या आई श्री. लक्ष्मीबाई फणसेकर ह्यांना दिनांक २३/०५/२०१७ ते १६/०६/२०१७ बॉम्बे हॉस्पीटल व दिनांक १६/०६/२०१७ या कालावधीत जनसेवा हेल्थ केअर हॉस्पीटल वसई येथे उपचार घेतल्या कामी झालेला खर्च रक्कम रु. ३,७८,८५३.९८/- मधून १०% कपात करुन रक्कम रु. ३,१४,०१९/- रुपयाची प्रतिपूर्ती करणेकामी ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ४. | प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) येथील प्रभाग क्र.८२ अलकापूरी येथील राजमाता नगर टर्न ते कालिका माता मंदीर पर्यत अलकापूरी नाल्याकरीता संरक्षक भिंत बांधणे कामास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमूद कामास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ५. | मुख्य कार्यालयाकडील उद्यान विभागास २ नग हायड्रोलिक लॅडर (शिडी) खरेदी करणेकामी झालेल्या ठरावात बदल करणेबाबत. | ठराव :- सदर प्रस्तावाचे सभेमध्ये वाचन करुन चर्चा केली असता मुख्य कार्यालयाकडील उद्यान विभागास दोन ९०९ ह्या पध्दतीच्या चेसीस शासकीय दराने खरेदी करणेंस व आधुनिक पध्दतीची हायड्रोलिक लॅडर (शिडी) आवश्यक घटकांसहित बसविण्याचे काम ई-निविदा प्रक्रिया करुन इच्छुक ई-निविदाधारकांकडून करुन घेणे तसेच आधुनिक पध्दतीच्या हायड्रोलिक लॅडर शिडी (गाडी) खरेदीसाठी येणाऱ्या अंदाजित रक्कम रू.७४,००,०००/- पर्यंतच्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री किशोर ना. पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६. | केंद्र शासन पुरुस्कृत अमृत अभियान अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेच्या धुकटन येथील १४० द.ल.ली. क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राजवळ सौर उर्जेपासुन १मे.वॅ.विद्युत निर्मिती प्रकल्प उभारणे कामी प्राप्त ई-निविदा रद्द करुन फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी प्राप्त सर्व निविदाकारांच्या निविदा रद्द करून फेर-निविदा मागविण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्री.अजीत नाईक सूचक :- मा.श्री. वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ७. | महानगरपालिकेचे द्विनोंद लेखापध्दतीचे कामकाज करणेबाबत. | ठराव :- सन १५-१६ चे लेखे अंतिमीकरण करणे व सन १५-१६-१७-१८ चे डेटा एन्ट्रीसह लेखे अंतिमीकरण करणे. तसेच सन २०१८-१९ या कालावधीचे कामाकरीता आवश्यकते नुसार मुळ घटक क्र.२ चे कामकाज करणे व अ.क्र. ४ मधील दराने ४ सहाय्यक तूर्त उपलब्ध करून घेवून भविष्यात वेळोवेळी मा.आयुक्त सो. यांच्या स्वतंत्र मान्यतेने वाढीव सहाय्यक उपलब्ध करून घेणे कामी खालील दर्शविलेल्या दराप्रमाणे |

| Sr.No. | Description | Per Unit | Subham Commerce |
|---|---|---|---|
| २. | Preparation of Annual Balance Sheet | Financial Year | ७.४०.००० |
| ४. | Jr. Accounts Executive for Account keeping | Man Month | ३५,००० |

| | | |
|---|---|---|
| | | मे.शुभम कॉमर्स यांच्या बरोबर संविदा करणेंस मा.स्थायी समिती सभा प्रशासकीय व वित्ती मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. कन्हैय्या भोईर सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८. | वसई विरार शहर महानरपालिकेच्या सर डी.एम.पेटीट व तुळींज या दोन रुग्णालयांना ETP बसविणेकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व ठरविण्यांत आले की, महापालिकेच्या उपरोक्त दोन रुग्णालयांसाठी ETP प्रकल्प उभारावा व त्यासाठी येणाऱ्या रु. ६२,६१,०४०/- (GST सह) खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत असून सदर कामी B/२ प्रकारची निविदा मागविण्यांस मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९. | प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील प्रभाग क्र.५७ मध्ये समेळ (सम्राट अशोका नगर) येथे गेट बांधणे कामास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करणेंत आली, चर्चेअंती सदर विषय तहकुब ठेवणेंस सभेने मान्यता दिली.<br>**अनुमोदक :- मा.श्री.महेश पाटील सूचक :- मा.श्री. सुदेश चौधरी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १०. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती -अे, बोळींज विभाग येथिल दैनंदिन बाजारकर वसुलीचा वार्षिक ई-निविदा ठेका काढण्याकामी तसेच जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यास मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती- अे अंतर्गत येणाऱ्या बोळींज विभागात दैनंदिन बाजार वसुलीकामी वार्षिक ठेका देण्यांत येतो. सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाची वार्षिक ठेक्याची मुदत ०९ एप्रिल २०१८ ला संपत आहे. सदर वार्षिक ठेका रक्कम रु. ९८००२१/- होता. सन २०१८-१९ करीता रक्कम रु. ९८००२१/- या रक्कमेवर १०% वाढ रक्कम रु. ९८००२/- करुन एकूण रक्कम रु. १०,७८,०२३/- (अक्षरी दहा लाख अठ्याहत्तर हजार तेवीस रु. मात्र) निश्चित करुन बाजार वसुली ठेका काढण्यासाठी जाहिर ई-निविदा प्रसिध्द करुन सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता बाजार कर वसुली वार्षिक ई-निविदा पध्दतीने ठेका देण्यास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर ना. पाटील सूचक :- मा.श्री. सखाराम महाडीक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ११. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) वॉर्ड क्र.२७ मध्ये जिल्हा परिषद शाळा ते अष्टविनायक अपा.पर्यंत रस्त्यास दुभाजक बसविणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती ठराव क्र. १६८ दि. २८/०४/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे. हिरालाल सोनार यांची संविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) ३.१५% कमी दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कामी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सखाराम महाडिक सूचक :- मा.श्री. किशोर ना. पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| १२. | प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील प्रभाग क्र.६० मध्ये मौजे आचोळे सर्वे नं.९३ A/२/३/४ मध्ये वसई विरार परिवहन सेवेच्या बस डेपोसाठी माती भराव करणे कामास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- वरील प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमूद कामाच्या रक्कम रु. ४४,९७,२१२/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १३. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'आय' कार्यालयीन इमारतीच्या टेरेसवरील मोबाईल टॉवर काढणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. वरील कामी मोबाईल टॉवर काढून जागा रिक्त करुन ताब्यात घेण्यात यावी अशी ही सभा निर्णय देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १४. | अग्निशमन विभागास वॉटर बाऊझर विथ टॉवर मॉनिटर अग्निशमन वाहन फॅब्रिकेश करुन वाहन खरेदी बाबत. | ठराव :- अग्निशमन विभागास वॉटर बाऊझर विथ टॉवर मॉनिटर अग्निशमन वाहन फॅब्रिकेश करणे व साहित्य पुरवठा करणे कामी मे. हायटेक सर्व्हिसेस पुणे यांचे वाटाघाटीअंती दिलेल्या दराने संविदा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच वाहन तयार करणे कामासाठी मान कंपनीचे मॉडेल क्र. CLA 31.300 BS IV 9s 8x4 CBC DY AC ट्रक चॅसीस एख नग महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५ (२) २ अन्वये विना निविदा थेट मान कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यांकडून महानगरपालिकेमार्फत खरेदी करुन फॅब्रिकेशन कामासाठी देण्यास व चॅसीस खरेदी कामा लागणारी रक्कम ॲडव्हान्स पेमेंट स्वरुपात देण्यास तसेच याकामी लागणाऱ्या रु. २१,२०,२२४.८४ लक्ष पर्यंतच्या वाढीव खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. सखाराम महाडीक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १५. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागासाठी कंन्स्ट्रक्शन ट्रॅकर (बजेट कन्ट्रोल सहित) सॉफ्टवेअर (संगणक प्रणाली ) तयार करणेबाबत. | ठराव :- सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेंस आली. याकामी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागासाठी कन्स्ट्रक्शन ट्रॅकर (बजेट कन्ट्रोल संहित) सॉफ्टवेअर (संगणक प्रणाली) तयार करणेसाठी एजन्सी नियुक्त करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १६ | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दि. ३०/१०/२०१७ ते दि. ०५/११/२०१७ दि. ०६/११/२०१७ ते दि. १२/११/२०१७ तसेच दि. २२/०१/२०१८ ते दि. २८/०१/२०१८ व दि. | ठराव :- सदर बाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. प्रस्तावातील माहिती मा.स्थायी समिती सभेत अवलोकन केली. त्यानुसार संबंधितांने नोंद घेवून कार्यवाही करणेंस सभेने एकमताने मंजूरी दिली.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्रीम. सुषमा लोपीस**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| | २९/०१/२०१८ ते दि. ०४/०२/२०१८ तसेच दि. ०५/०२/२०१८ ते दि. ११/०२/२०१८ व दि. १२/०२/२०१८ ते दि. १८/०२/२०१८ व दि. १९/०२/२०१८ ते दि. २५/०२/२०१८ या कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घनांचे प्रतिवृत्त माहितीसाठी स्थायी समितीस सादर. | |
| १७. | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०५ नुसार मुख्यालय लेखा विभागाचा लेखापरिक्षण अहवाल मा. स्थायी समिती सभेपुढे सादर करणेबाबत. | ठराव :- लेखापरिक्षण विभागाने शहर महानगरपालिका मुख्यालय लेखा विभागाच्या दि. १ एप्रिल २०१५ ते दि. ३१ मार्च, २०१६ या आर्थिक वर्षातील लेखापरिक्षण अहवालास ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.सखाराम महाडीक सूचक :- मा.श्री. पंकज पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

नगरसचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका